नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २४/०३/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक १३/११/२०१९ चे १२.४५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ७९८/२०१९ कलम ३५४ (ड), ५०६ भादवी सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १३/११/२०१९ चे ०८.०० वा. दरम्यान १६ वर्षीय पिडीत ही फिर्यादीची मुलगी आहे. आरोपी नामे — केशव ज्ञानेश्वर देवके, वय २६ वर्ष, रा. कळमेश्वर याने पिडित मुलगी टयुशन क्लासला जात असतांना तिचा पाठलाग करून धमकावून 'माझ्या सोबत चल' असे म्हणून तिचा विनयभंग केला. आरोपीला दिनांक १३/११/२०१९ चे १३.५० वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मसपोनि वैशाली सज्जन, पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २४/०३/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. ओ. पी. जैस्वाल, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यामध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रु. दंड व दंड न भरल्यास ७ दिवस साधी कैद व कलम ५०६ भादंवि मध्ये ३ महिने सश्रम कारावास व ५००/—रु. दंड व दंड न भरल्यास ५ दिवस साधी कैद शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. चेतन ठाकुर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाजे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. प्रमोद कडबे, पोहवा श्री. मनोज तिवारी यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर